# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 November 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली, २८८ मतदारसंघात चार हजार १४० उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात
- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची विधानसभा निवडणुकीतून माघार
- निवडणुकीसाठी राज्यात सुमारे नऊ कोटी ७० लाखाहून अधिक मतदार
- राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश

आणि

- जालन्यातल्या आदिती को–ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीमधल्या ३१ लाख रुपयांच्या चोरी प्रकरणात बँकेच्या रोखपालासह लिपीक आणि शिपायाला अटक

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत काल संपली. यंदा राज्यातल्या २८८ मतदारसंघात सात हजार ७८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते, त्यापैकी दोन हजार ९३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानं आता राज्यात चार हजार १४० उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. राज्यात अनेक मतदारसंघात बंडखोरी शमली नसल्याचं दिसून आलं.

मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांमधल्या मतदारसंघांची माहिती जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधींकडून:

*‘‘छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदारसंघात ३९७ उमेदवारांपैकी २१४ उमेदवारांनी काल माघार घेतली असून, आता १८३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.*

*औरंगाबाद मध्य मतदारसंघात २४, औरंगाबाद पश्चिम – १८, औरंगाबाद पूर्व – २९, सिल्लोड –२४, कन्नड – १६, फुलंब्री – २७, पैठण – १७, गंगापूर – १८, तर वैजापूर मतदारसंगात दहा उमेदवार निवडणुक लढवणार आहेत.*

**

*नांदेड जिल्ह्यातल्या नऊ मतदारसंघात २९४ उमेदवारांनी माघार घेतली असून, आता निवडणुकीच्या रिंगणात १६५ उमेदवार राहिले आहेत. यामध्ये सर्वाधिक ३३ उमेदवार नांदेड उत्तर मतदारसंघात आहेत. त्या खालोखाल २५ उमेदवार भोकर मतदारसंघात आहेत. किनवट – १७, हदगाव – २४, नांदेड दक्षिण – २०, लोहा – १४, नायगाव – १०, देगलूर – ११, आणि मुखेड विधानसभा मतदारसंघात ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.*

**

*जालना जिल्ह्यातल्या पाच मतदारसंघात ११९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानं आता १०९ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. यामध्ये परतूर मतदारसंघात – ११, घनसावंगी – २३, जालना – २६, बदनापूर – १७ आणि भोकरदन मतदारसंघात ३२ उमेदवार आहेत.*

*घनसावंगी मतदारसंघात भाजपचे बंडखोर सतीश घाटगे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे, जालना मतदारसंघात भाजपाचे भास्कर दानवे यांनी माघार घेतली आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी नांदेडहून अनुराग पोवळे, जालन्याहून बाबासाहेब म्हस्के यांच्यासह समीर पाठक, छत्रपती संभाजीनगर*

**

*धाराशिव जिल्ह्यातल्या चार विधानसभा मतदारसंघातल्या ९८ उमेदवारांनी माघार घेतली असून, आता ६६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक २३ उमेदवार तुळजापूर मतदारसंघात असून, परांडा – २१, उस्मानाबाद – १२, तर उमरग्यात १० उमेदवार आहेत.*

**

*परभणी जिल्ह्यातल्या चार मतदारंघातल्या ९२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून, जिल्ह्यात आता ५८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. जिंतूर मतदारसंघात १७, परभणी – १५, पाथरी – १४ तर गंगाखेड मतदारसंघात १२ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.''*

**आकाशवाणी बातम्यांसाठी धाराशिवहून देविदास पाठक आणि परभणीहून सुदर्शन चापके यांच्यासह वैभवी जोशी, छत्रपती संभाजीनगर**

****

*''बीड जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात ३७७ उमेदवारांपैकी २३८ उमेदवारांनी माघार घेतली असून, आता १३९ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये गेवराई मधून २१, माजलगाव – ३४, बीड – ३१, आष्टी – १७, केज – २५, तर परळी मतदारसंघात ११ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.*

*बीड मतदारसंघात नुकत्याच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षात प्रवेश केलेल्या ज्योती मेटे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. तर भाजपचे बंडखोर जयदत्त क्षीरसागर यांनी मात्र अर्ज मागे घेतला आहे. माजलगाव मतदारसंघातून रमेश आडसकर यांनी आपला अर्ज कायम ठेवला आहे, ते अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात आहेत.*

**

*लातूर जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात ८७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून, आता १०६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. लातूर ग्रामीण मध्ये १८, लातूर शहर – २३, अहमदपूर – २०, उदगीर – १३, निलंगा – १३ तर औसा मतदारसंघात १९ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.*

*उदगीर मतदारसंघात भाजप बंडखोर विश्वजित गायकवाड आणि अहमदपूर इथले भाजप बंडखोर माजी आमदार बब्रुवान खंदाडे, भारत चामे यांनी माघार घेतली आहे. तर निलंगा मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोर अशोक पाटील निलंगेकर यांनीही आपली उमेदवारी मागे घेतली आहे.*

**

*हिंगोली जिल्ह्यातल्या तीन मतदारसंघात १२६ उमेदवारांपैकी ७२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून, आता ५३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हिंगोली मतदारसंघात २३, वसमत – ११, तर कळमनुरी मतदारसंघात १९ उमेदवार आहेत.*

*हिंगोली मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोर उमेदवार भाऊ पाटील गोरेगावकर आणि भाजपचे बंडखोर रामदास पाटील सूमठानकर यांनी, तर कळमनुरी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अजित मगर यांनी आपली उमेदवारी कायम ठेवली आहे.''*

**आकाशवाणी बातम्यांसाठी बीड इथून रवी उबाळे, लातूर इथून शशिकांत पाटील, हिंगोली इथून रमेश कदम यांसह समरजीत ठाकूर आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

****

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत वैध ३९ उमेदवारांपैकी काल २० उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. आता या निवडणुकीत १९ उमेदवार लढणार आहेत.

****

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना त्यांनी अर्ज मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. मित्रपक्षांनी अर्ज पाठवले नसल्यामुळे माघार घेत असल्याचं, त्यांनी जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलताना काल सांगितलं. मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठीचा लढा यापुढेही सुरूच राहणार असल्याचं ते म्हणाले.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल ठाणे जिल्ह्यातल्या डोंबिवली इथून प्रचाराला सुरुवात केली. पक्षांतर करुन पक्ष आणि पक्षाच्या निशाणीवर दावा सांगणाऱ्या आमदारांवर त्यांनी यावेळी टीका केली.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातल्या आठ विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातल्या २८८ मतदारसंघात सुमारे नऊ कोटी ७० लाखाहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संख्येत पुणे जिल्हा आघाडीवर असून, रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे. अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक, तर बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

****

निवडणूक आयोगानं राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे निर्देश दिले आहेत. रश्मी शुक्ला यांच्याकडील पदभार त्यांच्या नंतरच्या ज्येष्ठता क्रमवारीतल्या पोलीस अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश आयोगानं मुख्य सचिवांना दिले आहेत. त्यानुसार, विवेक फणसाळकर यांच्याकडे पोलीस महासंचालकपदाचा पदभार सोपवण्यात आला आहे. तसंच तीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची नावं निवडणूक आयोगाला सुचवण्यास सांगितलं आहे.

****

जालना शहरातल्या आदिती को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीमधल्या ३१ लाख रुपयांच्या चोरी प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं काल बँकेच्या रोखपालासह लिपीक आणि शिपायाला अटक केली. संशयितांनी यापूर्वी बनावट सोने तारण ठेवल्याचा प्रकार उघडकीस येऊ नये, तसंच कर्जाचे हप्ते भरण्यासाठी संगनमत करून करून बँकेत चोरी केल्याचं तपासात समोर आल्याची माहिती पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिली. संशयितांनी चोरलेले रोख नऊ लाख ९३ हजार रुपये आणि आठ लाख ८३ हजारांचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

****

ज्येष्ठ कृषी जलतज्ज्ञ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सु. भि. वराडे यांचं काल छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. वराडे यांनी १९७४ मध्ये परभणी कृषी विद्यापीठात मृद्शास्त्र आणि कृषी विज्ञान विभाग प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर मराठवाड्यातल्या कृषी क्षेत्रात योगदान दिलं. शिक्षण आणि संशोधनात त्यांनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय

पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटवला. त्या काळात भात शेतीच्या संशोधनात त्यांनी केलेल्या कामामुळे तांदूळ उत्पदनात देशभर लक्षणीय वाढ झाली. वराडे पार्थिवावर काल बनेवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक अणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी–मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार सहा ते १९ नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

****